09 FEB 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यात येणाऱ्या सात जागांवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचाच वरचष्मा राहिला.

# 'व्यवस्थापन'वर विकास आघाडीचा वरचष्मा

## शिवाजी विद्यापीठ : प्रा. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर यांची बाजी; पृथ्वीराज पाटील बिनविरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यात येणाऱ्या सात जागांवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचाच वरचष्मा राहिला. सातपैकी पाच जागा बिनविरोध झाल्या तर शिक्षकांतील खुल्या प्रवर्गातील एका जागेवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार प्रा. रघुनाथ ढमकले हे विजयी झाले. ढमकले यांनी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) उमेदवार प्रा. निवास वरेकर यांचा चाळीस विरुद्ध चौदा मतांनी पराभव केला.

पदवीधर गटातील खुल्या प्रवर्गातील एका जागेसाठी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार स्वागत परुळेकर यांनी बाजी मारली. या निवडणुकीत त्यांनी सुटा व डाव्या संघटनेचे उमेदवार श्वेता परुळेकर यांचा ४२ विरुद्ध ११ मताने पराभव केला.

व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून डीवायपी ग्रुपचे प्रमुख व विद्यापीठ विकास आघाडीचे नेते संजय डी. पाटील यांचे पुत्र पृथ्वीराज पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज होता. त्यामुळे व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून खुल्या प्रवर्गातून पृथ्वीराज पाटील यांची बिनविरोध निवड जाहीर झाली. प्राचार्य गटातून दोन उमेदवार व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यायच्या होत्या.

त्यामध्ये न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील व सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांचे दोन अर्ज असल्यामुळे दोघांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. पदवीधर गटातील दोन जागांपैकी एसटी गटातील अमरसिंह रजपूत यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.

या सभेत अधिसभा सदस्यांमधून विद्यापीठ विद्या परिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून डॉ. मंजिरी अजित मोरे यांची निवड झाली. अधिसभा सदस्यांमधून विद्यापीठ स्थायी समितीवर निवडून द्यायच्या प्राचार्य गटातील एका जागेसाठी डॉ. सर्जेराव रघुनाथ पाटील, तर प्राध्यापक गटातील एका जागेवर प्रा. प्रशांत खरात यांची व नोंदणीकृत पदवीधर गटातून डॉ. अजित पाटील यांची बिनविरोध निवड झाली.

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती निवड समितीवर अभिषेक मिठारी यांची निवड झाली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमअंतर्गत तक्रार निवारण समितीवर विद्यापीठातील प्रा. डॉ. शंकर हंगेरीकर शिक्षकेतर कर्मचारी गटातून डॉ. अर्चना कोलेकर यांची निवड करण्यात आली. महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांची तपासणीसाठी एका सदस्याची निवड करण्यात आली. यामध्ये सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची निवड करण्यात आली. या निवडणूकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

0 9 FEB 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर विकास आघाडीचे वर्चस्व

**आठ जागापैकी पाच बिनविरोध : एक रिक्त आणि दोन जागांसाठी मतदान : पहिल्याच अधिसभेत शिक्कामोर्तब : ५४ सदस्यांनी बजावला मतदानाचा हक्क**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यात येणाऱ्या आठ जागेपैकी सात जागेवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचेच वर्चस्व राहिले. सातपैकी पाच जागा बिनविरोध झाल्या. तर खुल्या प्रवर्गातील शिक्षक एक आणि नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघातील एक अशा दोन जागेसाठी निवडणूक लागली. सिनेटमध्ये झालेल्या मतदानातून विकास आघाडीचे उमेदवार प्रा. रघुनाथ ढमकले शिक्षक गटातून तर पदवीधरमधून स्वागत परूळेकर निवडून आले. निवडणूक पार पडल्यानंतर व्यवस्थापन सदस्य पृथ्वीराज पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

निवडणुकीनंतर पहिलीच अधिसभा झाली. या अधिसभेत व्यवस्थापन परिषदेसाठी दोन जागांच्या मतदानातून शिक्षक मतदारसंघातून प्रा. ढमकले यांनी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) उमेदवार प्रा. निवास वरेकर यांचा २८ मतांनी पराभव केला. सुटाचे आणखी एक उमेदवार प्रा. मनोज गुजर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. राखीव प्रवर्गातील एका जागेवर सुटाचे प्रा. बबन सातपुते बिनविरोध निवडून आले. पदवीधर मतदारसंघातून विकास आघाडीच्या स्वागत परूळेकर यांनी सुटाच्या श्वेता परूळेकर यांचा ३१ मतांनी पराभव केला. तर एक मत अवैध ठरले. सभागृहातील ५४ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून खुल्या प्रवर्गातून पृथ्वीराज पाटील, प्राचार्य गटातून प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, पदवीधर गटातून अमरसिंह राजपूत बिनविरोध निवडून आले. आठ पैकी सात सदस्य निवडून दिले तर एक जागा रिक्त राहिली. विद्यापीठातील विद्यापरिषदेसह वेगवेगळ्या गटातील जागेवर विकास आघाडीच्या उमेदवारांनी बाजी मारली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व प्र–कुलगुरू पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सिनेट सभा झाली. प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले.

अधिसभेत सदस्यांमधून विद्यापीठ विद्यापरिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून डॉ. मंजिरी मोरे यांची निवड झाली. अधिसभा सदस्य मधून विद्यापीठ स्थायी समितीवर निवडून द्यायच्या प्राचार्य गटातील एका जागेसाठी डॉ. सर्जेराव पाटील. प्राध्यापक गटातील एका जागेवर प्रा. प्रशांत खरात तर नोंदणीकृत पदवीधर गटातून डॉ. अजित पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे.

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती निवड समितीवर अभिषेक मिठारी यांची निवड झाली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम अंतर्गत तक्रार निवारण समितीवर विद्यापीठातील डॉ. शंकर हंगेरीकर शिक्षकेतर कर्मचारी गटातून डॉ. अर्चना कोलेकर यांची बिनविरोध निवड झाली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम अंतर्गत महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांची तपासणीसाठी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे या सदस्याची निवड केली.

### सुटाच्या डॉ. प्रकाश कुंभार यांनी घेतली माघार

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या निवडणुकीत विकास आघाडीचे उमेदवार डॉ. शंकर हंगेरीकर यांच्या विरोधात सुटाचे उमेदवार डॉ. प्रकाश कुंभार होते. परंतू निवडणुकी दरम्यान विद्यापीठ प्रशासनाने त्यांना माघार घेण्यासाठी वेळ न देताच हात वर करून मतदान घेत मतमोजणीला सुरूवात केली. तेंव्हा डॉ. कुंभार आणि मनोज गुजर यांनी आक्षेप घेत विद्यापीठ प्रशासनाला जाब विचारला. त्यानंतर नियमाप्रमाणे वेळ दिल्यानंतर डॉ. कुंभार यांनी माघार घेतली. परंतू प्रशासनाची गडबडघाई लक्षात आणून देत अभिसभा सदस्यांसह विद्यापीठ प्रशासनाच्या डोळ्यात अंजन घातले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्याच अधिसभेत व्यवस्थापन परिषदेसाठी झालेल्या निवडणुकीनंतर विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार प्रा. रघुनाथ ढमकले यांचा सत्कार करताना व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील. सोबत व्यवस्थापन व अधिसभा सदस्य.**

### गुलाल उधळत आनंद साजरा

व्यवस्थापन परिषदेवर विकास आघाडीचे उमेदवार स्वागत परूळेकर यांनी ३१ मतांनी विजय मिळवल्यानंतर अभाविपच्या सदस्यांनी गुलालाची उधळण करीत आनंद व्यक्त केला

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ विकास आघाडीचा व्यवस्थापन परिषदेवरही दबदबा

## सातपैकी पाच जागा बिनविरोध; 'शिक्षक'मधून ढमकले, 'पदवीधर'मधून स्वागत परुळेकर विजयी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यात येणाऱ्या सात जागेवर विद्यापीठ विकास आघाडीने दबदबा कायम ठेवला आहे. सातपैकी पाच जागा बिनविरोध झाल्या आहेत. प्रत्यक्ष झालेल्या निवडणुकीत शिक्षकांच्या खुल्या गटातून शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार प्रा. रघुनाथ ढमकले तर नोंदणीकृत पदवीधर खुल्या गटातून स्वागत परुळेकर विजयी झाले आहेत.



**कोल्हापूर : विशेष अधिसभेनंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना विद्यापीठ विकास आघाडीचे पदाधिकारी आणि नवनिर्वाचित सदस्य. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीनंतर पहिल्यांदाच निवासराव वरेकर यांच्यात निवडणूक झाली. प्रा. ढमकले यांनी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) उमेदवार प्रा. निवास वरेकर यांचा ४० विरुद्ध १४ मतांनी पराभव केला. शिक्षक गटातील दोन जागेपैकी राखीव प्रवर्गातील जागेवर 'सुटा'चे प्रा. बबन सातपुते यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर झाली. 'सुटा'चे उमेदवार प्रा. मनोज गुजर यांना शून्य मते पडली.

पदवीधर खुल्या गटात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार स्वागत परुळेकर, श्वेता परुळेकर यांच्यात निवडणूक झाली. यात स्वागत परुळेकर यांनी बाजी मारली. त्यांनी 'सुटा' व डाव्या संघटनेच्या उमेदवार श्वेता परुळेकर यांचा ४२ विरुद्ध ११ मतांनी पराभव केला. ५४ अधिसभा सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यातील एक मत अवैध ठरले. पदवीधर गटातील दोन जागांपैकी एस. टी. गटातील अमरसिंह रजपूत यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. व्यवस्थापन परिषदेवर आठ सदस्य निवडून द्यायचे होते. मात्र, व्यवस्थापन प्रतिनिधी गटात अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी उमेदवार न मिळाल्यामुळे ती जागा रिक्त राहिली.

### डॉ. कुंभार-प्रा. ढमकले यांच्यात शाब्दिक चकमक

तक्रार निवारण समितीवर विद्यापीठातील शिक्षकाचे नामनिर्देशन करताना हात उंचावून मतदान करताना 'सुटा'चे डॉ. कुंभार यांनी अर्ज माघारीसाठी वेळ दिला नसल्याचे सांगत आक्षेप घेतला. प्रा. ढमकले यांनी निवडणूक प्रक्रिया मधेच थांबवू नये, अशी सूचना केली. यावर डॉ. कुंभार व प्रा. ढमकले यांच्या शाब्दिक चकमक उडाली.

व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून डी. वाय. पाटील ग्रुपचे प्रमुख व विद्यापीठ विकास आघाडीचे नेते संजय डी. पाटील यांचे सुपुत्र पृथ्वीराज पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. प्राचार्य गटातून व्यवस्थापन परिषदेवर न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील व सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांचे दोन अर्ज आल्याने दोघांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली.



प्रा. रघुनाथ ढमकले



स्वागत परुळेकर

अधिसभा सदस्यांमधून विद्या परिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून डॉ. मंजिरी मोरे यांची निवड झाली. विद्यापीठ स्थायी समितीवर प्राचार्य गटातून डॉ. सर्जेराव पाटील, प्राध्यापक गटातून प्रा. प्रशांत खरात यांची व नोंदणीकृत पदवीधर गटातून डॉ. अजित पाटील यांची बिनविरोध निवड झाली. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती निवड समितीवर अॅड. अभिषेक मिठारी यांची निवड करण्यात आली. तक्रार निवारण समितीवर विद्यापीठातील प्रा. डॉ. शंकर हंगिरगेकर यांची तर शिक्षकेतर कर्मचारी गटातून डॉ. अर्चना कोलेकर यांची निवड करण्यात आली. शिक्षक गटातून 'सुटा'चे प्रकाश कुंभार यांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज माघारी घेतला. महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांची तपासणीसाठी नामनिर्देशित सदस्य म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची निवड करण्यात आली.

> शिवाजी विद्यापीठातील प्रत्येक घटकास मदत केली आहे. त्यामुळेच अधिसभेसह व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व वेगवेगळ्या गटांमधील जागा व अधिकार मंडळावरदेखील विद्यापीठ विकास आघाडीचे चौथ्यांदा वर्चस्व कायम राहिले आहे. 'एनआयआरएफ' व नॅक मानांकनसह विद्यापीठास जागतिक शंभर विद्यापीठाच्या यादीत आणण्याचे प्रयत्न असणार आहेत.
>
> **- डॉ. संजय डी. पाटील,**
> अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी

0 9 FEB 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवस्थापन परिषदेवर प्रा. ढमकले, स्वागत परुळेकर

## सातपैकी पाच जागा बिनविरोध

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यात येणाऱ्या सात जागांवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने सरशी मिळवली. एकूण सातपैकी पाच जागा बिनविरोध झाल्या, तर दोन जागांवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे प्रा. रघुनाथ ढमकले व स्वागत परुळेकर यांनी विजय मिळवला. विद्यापीठ परिसरामध्ये विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला.

सिनेट निवडणुकीनंतर शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यात येणाऱ्या सदस्यांसाठी बुधवारी विशेष अधिसभा बोलावण्यात आली होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू पी. एस. पाटील व प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सिनेट सभा झाली. शिक्षकांतील खुल्या प्रवर्गात विद्यापीठ विकास आघाडीचे प्रा. रघुनाथ ढमकले यांनी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) प्रा. निवास वरेकर यांचा पराभव केला. प्रा. ढमकले यांना ४०, तर प्रा. वरेकर यांना १४ मते मिळाली. पदवीधर गटातील खुल्या प्रवर्गातील एका जागेसाठी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे उमेदवार स्वागत परुळेकर व श्वेता परुळेकर यांच्यामध्ये लढत झाली. एकूण ५४ मतांपैकी एक मत बाद ठरले. ५३ मतांपैकी स्वागत परुळेकर यांनी ४२, तर श्वेता परुळेकर यांनी ११ मते मिळवली.

**पृथ्वीराज संजय पाटील बिनविरोध**

**व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून विद्यापीठ विकास आघाडीचे नेते संजय डी. पाटील यांचे पुत्र पृथ्वीराज पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज होता. त्यामुळे व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून खुल्या प्रवर्गातून पृथ्वीराज पाटील यांची बिनविरोध निवड जाहीर झाली. उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले.**



व्यवस्थापन प्रतिनिधी गटामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गात उमेदवार न मिळाल्यामुळे एक जागा रिक्त राहिली. सात जागांसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. प्राचार्य गटातून न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील व सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, पदवीधर गटामध्ये एसटी गटामध्ये अमरसिंह राजपूत व शिक्षक गटातील राखीव प्रवर्गातील एका जागेवर प्रा. बबन सातपुते यांची बिनविरोध निवड झाली. विद्या परिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून डॉ. मंजिरी मोरे, अधिसभा सदस्यमधून विद्यापीठ स्थायी समितीवर प्राचार्य गटातील डॉ. सर्जेराव पाटील, तर प्राध्यापक गटातील प्रा. प्रशांत खरात व नोंदणीकृत पदवीधर गटातून डॉ. अजित पाटील यांची बिनविरोध निवड झाली. गुणवत्ता शिष्यवृत्ती निवड समितीवर अभिषेक मिठारी यांची निवड झाली. तक्रार निवारण समितीवर डॉ. शंकर हंगेरीकर शिक्षकेतर कर्मचारी गटातून डॉ. अर्चना कोलेकर यांची निवड करण्यात आली. महाविद्यालय तपासणीसाठी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची निवड करण्यात आली.

0 9 FEB 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ; डॉ. संजय डी. पाटील यांचे नेतृत्व; ढमकले, स्वागत परुळेकर विजयी

# विकास आघाडीच्या हाती 'मॅनेजमेंट'

▶सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ :शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) पाठोपाठ आता व्यवस्थापन परिषद (मॅनेजमेंट कौन्सिल) मध्ये डॉ. संजय डी. पाटील यांच्या नेतृत्वाखालील विद्यापीठ विकास आघाडीने वर्चस्व मिळविले.

व्यवस्थापन परिषदेतील दोन जागांसाठी आज झालेल्या निवडणुकीत प्रा. रघुनाथ ढमकले आणि ॲड. स्वागत परुळेकर यांनी विजय मिळवत आघाडीचे संख्याबळ वाढविले. स्थायी, तक्रार निवारण, महाविद्यालय तपासणी, गुणवत्ता शिष्यवृत्ती निवड समितीवरील नामनिर्देशनामध्ये आघाडीने बाजी मारली. या निवडणूक आणि नामनिर्देशनासाठी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सिनेटची पहिली बैठक झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी काम पाहिले.

व्यवस्थापन परिषदेतील शिक्षक प्रवर्गातील खुल्या गटातील एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत डॉ. ढमकले यांनी ४० मतांसह विजय मिळविला. विरोधातील 'सुटा'चे उमेदवार डॉ. निवासराव वरेकर यांना १४ मते मिळाली. नोंदणीकृत पदवीधर प्रवर्गामध्ये खुल्या गटातील एका जागेसाठी आतेबहीण-भाऊ यांच्या लढत झाली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निवडणुकीतील विद्यापीठ विकास आघाडीचे विजयी उमेदवार डॉ. रघुनाथ ढमकले यांचा सत्कार पृथ्वीराज पाटील आणि डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन केला. या वेळी विविध समित्यांवर निवड झालेले नूतन सदस्य उपस्थित होते.**

त्यात ॲड. परुळेकर यांनी ४२ मते घेत बाजी मारली. विरोधातील शिव-शाहू आघाडीच्या श्वेता परुळेकर यांना ११ मते मिळाली. अधिसभा सदस्यांची संख्या एकूण ६९ असून, त्यापैकी ५४ जणांनी व्यवस्थापन परिषदेतील दोन जागांसाठी मतदान केले. नोंदणीकृत पदवीधर गटात एक मत अवैध ठरले. या निवडणुकीनंतर विविध समितींवरील नामनिर्देशनाची प्रक्रिया झाली.

> 'विद्यापीठ विकास आघाडीने अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सिनेट निवडणुकीत देदीप्यमान यश मिळवित एकतर्फी वर्चस्व कायम राखले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ विकासासह उच्च शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी आम्ही योगदान देणार आहोत.
>
> **-डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव, विद्यापीठ विकास आघाडी

त्यात अधिसभा सदस्य डॉ. मंजिरी मोरे यांची विद्या परिषदेवर, प्राचार्य सर्जेराव पाटील, प्रा. प्रशांत खरात, डॉ. अजित पाटील यांची स्थायी समितीवर आणि डॉ. दत्तात्रय मोरे यांची महाविद्यालये तपासणी समितीवर बिनविरोध निवड झाली. डॉ. शंकर हंगिरगेकर, डॉ. अर्चना कोलेकर यांची विद्यापीठ तक्रार निवारण समिती, तर गुणवत्ता शिष्यवृत्ती समितीवर अभिषेक मिठारी यांची निवड झाली. हे सर्वजण विकास आघाडीचे सदस्य आहेत.

या निवडीनंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी उपस्थित अधिसभा सदस्यांना त्यांचे अधिकार आणि कर्तव्ये, सभागृहाचे कामकाज, विद्यापीठ कायदा, आदींबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान, विकास आघाडीच्या विजयी उमेदवार आणि पदाधिकारी, सदस्यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

### प्राचार्य, संस्थाचालक गट बिनविरोध

■ 'व्यवस्थापन परिषदेतील प्राचार्य गटात विकास आघाडीचे डॉ. व्ही. एम. पाटील, आर. व्ही. शेजवळ यांची आणि व्यवस्थापन प्रतिनिधी गटात पृथ्वीराज संजय पाटील यांची, तर नोंदणीकृत पदवीधर गटात अमरसिंग रजपूत आणि शिक्षक गटात 'सुटा'चे डॉ. बबन सातपुते यांची बिनविरोध निवड झाली. दरम्यान, या परिषदेवर न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. पाटील आणि डॉ. ढमकले यांना एकाचवेळी काम करण्याची संधी मिळाली आहे.

### 'सुटा'चा आक्षेप, कुलगुरूंचे स्पष्टीकरण

■ तक्रार निवारण समितीवरील नामनिर्देशनावेळी विकास आघाडीने डॉ. हंगीरगेकर, तर 'सुटा'ने डॉ. प्रकाश कुंभार यांचे नाव सुचविले. त्यानंतर हात उंचावून मतदानाची प्रक्रिया सुरू झाली. त्यावर डॉ. कुंभार, मनोज गुजर, श्वेता परुळेकर यांनी कागदपत्रे सादर करण्यासह माघारीसाठी मुदत दिली नसल्याच्या मुद्द्यावरून आक्षेप घेतला. विकास आघाडीचे डॉ. ढमकले यांनी निवडणूक प्रक्रिया सुरू ठेवावी, अशी मागणी केली. त्यावरून काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे यांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर डॉ. कुंभार यांनी उमेदवारी मागे घेतली.

महासत्ता

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर, ता.७ (प्रतिनिधी)-**

शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट देऊन 'मध्यस्थी' विषयावर पथनाट्य सादरीकरण केले.

कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील, विद्यापीठाचे विधी विभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष विवेकानंद घाटगे, कौटुंबिक न्यायालयाच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र पाटील उपस्थित होते.

विधी सेवा प्राधिकरण कार्याची सविस्तर माहिती देऊन न्यायालयीन वाद तडजोड आणि आपापसात मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन प्रीतम पाटील यांनी केले. डॉ. धूपदाळे यांनी वैकल्पिक वाद निवारण याबाबत मार्गदर्शन केले. विवेकानंद घाडगे यांनी प्रकरणांमध्ये मध्यस्थी करताना वकिलांची भूमिका कशा पद्धतीने बजावली पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले तर राजेंद्र पाटील यांनी पथनाट्यद्वारे विधी सेवेची माहिती वंचित घटकापर्यंत कशा पद्धतीने पोहोचवता येईल याबाबत सविस्तर माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद दाभाडे यांनी केले. तर आभार प्रियंका गुरव यांनी मानले. यावेळी राजीव माने, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, जयदीप कदम, चंद्रकांत कुरणे, देवदास चौगले, ऋता निंबाळकर, अंजली करपे यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात आजीवन अध्ययन, विस्तार विभागाची कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आजीवन अध्ययन व विस्तार विभागात एकदिवसीय मोफत टेरारियम कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अक्षय घोरपडे, अभिजित जाधव यांनी मार्गदर्शन केले. स्वागत डॉ. सुमन बुवा व प्रस्तावना संचालक डॉ. आर. जी. पवार यांनी केली. आभार श्रीमती श्वेता आठवले यांनी मानले. यावेळी उदय घाटे, प्रा. वाय. एस. बोकील, आर. एम. जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 9 FEB 2020 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑलिम्पिक टार्गेट शूटिंग रेंजच्या खेळाडूंची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातर्फे शांतिनिकेतन सांगली येथे घेण्यात आलेल्या इंटर कॉलेज नेमबाजी स्पर्धेमध्ये कोल्हापुरातील ऑलिम्पिक टार्गेट शूटिंग रेंजच्या चार खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांची निवड उत्तर प्रदेश राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी झाली आहे.



कोल्हापूर : राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध करणारे ऑलिम्पिक टार्गेट अ‍ॅकॅडमीचे खेळाडू. सोबत प्रशिक्षक विनय पाटील व तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण.

स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल प्रकारांमधून शौर्य श्रेयांस डुणूंग यांन तृतीय क्रमांक पटकावला. कणक प्रशांत शिंदे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. १० मीटर एअर रायफल प्रकारात श्रावणी जितेंद्र पवार हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच प्रतीक आनंदा जोंग यांन प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांना प्रशिक्षक विनय पाटील, तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण, सुहास जगदाळे, अ‍ॅकॅडमीचे संचालक सचिन पाटील व पालक यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभत आहे.

पुढारी

# १३, १४ फेब्रुवारीला स्थगित पेपर होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठीय व महाविद्यालयीन कर्मचारी संपामुळे २, ३ व ४ फेब्रुवारी रोजी स्थगित केलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार बी.कॉम. भाग-चे पेपर १३ व १४ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणार आहेत.

बुधवारी एम.ए., एम.एस्सी., एमबीए, बी.टेक., बीए., एमसीए., एम.ए., बी. आर्किटेक्चर, एमएसडब्ल्यू., डिप्लोमा इन टॅक्सेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.कॉम. आदी २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागात झाल्या. परीक्षांसाठी ५६०१ विद्यार्थी उपस्थित होते. ८ फेब्रुवारी बीए.,बीएड., सेमी-७ व ८ या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

09 FEB 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बी. ए., बी. एस्सी. पदवीस्तर परीक्षा महाविद्यालयात होणार

## १५ फेब्रुवारीपासून प्रारंभ; कर्मचारी संपाचा परिणाम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या संपामुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत पदवी स्तरावरील बी. ए., बी. एस्सी. परीक्षा (प्रथम वर्ष प्रथम, द्वितीय सत्र) महाविद्यालय स्तरावर १५ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षा कामकाजावर कर्मचाऱ्यांनी टाकलेल्या बहिष्कारमुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या (प्रथम वर्ष प्रथम, द्वतीय सत्र) महाविद्यालय स्तरावर घेतल्या जाणार आहेत. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने बुधवारी प्रसिद्धीस दिले आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालय, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर परीक्षा घेण्यास मान्यता दिली आहे. बी. ए. व बी. एस्सी. या पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालय, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर होतील. सर्व अभ्यासक्रमातील 'एसईसी' विषयांच्या



**शिवाजी विद्यापीठातून**

प्रथम वर्ष पदवी स्तरावरील परीक्षा महाविद्यालय पातळीवर घेण्यात येणार आहेत. या विषयांचे विद्यार्थ्यांचे प्राप्त गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत नोंद करावेत. सर्व परीक्षा महाविद्यालय मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर वर्णनात्मक पद्धतीने होणार असल्याने ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत, त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील शिक्षकांकडून तयार करून घेण्याच्या सूचना प्राचार्यांनी द्याव्यात, असे पत्रकात म्हटले आहे.

पुण्यनगरी

# परीक्षा घेण्याचे अधिकार महाविद्यालयांना

## कर्मचारी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा कामकाजावर कर्मचाऱ्यांनी टाकलेल्या बहिष्कारामुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी परीक्षा विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (प्रथम व द्वितीय सत्राच्या परीक्षा) महाविद्यालयीन स्तरावर घेण्यास विद्यापीठ प्रशासनाने मान्यता दिली आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार हा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार बीए व बीएससी या पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रथम व द्वितीय सत्राच्या परीक्षा दि. १५ ते २८ फेब्रुवारी या कालावधीमध्ये महाविद्यालय तसेच मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर घेण्यात याव्यात. अभ्यास मंडळांनी निश्चित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावी. परीक्षांची गोपनीयता जपण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अमलात आणाव्यात, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आलेल्या आहेत.

0 9 FEB 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या स्थगित परीक्षा सोमवारपासून

## महाविद्यालयांवर पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षांची जबाबदारी; ३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. ८ : विविध प्रलंबित मागण्यांसाठी विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे शिवाजी विद्यापीठाने २ ते ४ फेब्रुवारीदरम्यान काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. त्या परीक्षांचा प्रारंभ सोमवार (ता. १३) पासून होणार आहे. त्यात पहिल्यांदा बी. कॉम. भाग एक अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. त्याचे वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज जाहीर केले.

गेल्या दोन वर्षांपासून बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. भाग एक अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालयांकडून घेतल्या जात आहेत. विद्यापीठ या परीक्षांचे वेळापत्रक ठरवून देण्यासह महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका पुरवित होते. मात्र, यावर्षी विद्यापीठाने वेळापत्रक निश्चिती, प्रश्नपत्रिका तयार करण्यासह परीक्षा घेण्यापर्यंतची सर्व जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविण्याचा निर्णय बुधवारी घेतला.

त्यानुसार बी. ए., बी. एस्सी भाग एकच्या परीक्षा १५ ते २९ फेब्रुवारीदरम्यान घेण्याची सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिली आहे. एम.ए., एम. एस्सी., एमबीए., बी. टेक., एमसीए., अशा विविध २२ अभ्यासक्रमांची एकूण ५६०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा मंडळाने आतापर्यंत एकूण ३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. दरम्यान, राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीचे परीक्षा कामकाजावरील बहिष्कार आंदोलन सातव्या दिवशीही कायम राहिले.

> आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा सुरळीत आणि कमी वेळेत होण्यासाठी बी. ए., बी. एस्सी भाग एकच्या सत्र एक आणि दोनच्या परीक्षांचा जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविली आहे. बी. कॉम. अभ्यासक्रमाच्या उर्वरीत परीक्षा सोमवार, मंगळवारी घेण्यात येणार आहेत.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

तरूण भारत



कोल्हापूर : विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सचिव प्रितम पाटील व सोबत मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठच्या विद्यार्थ्यांची विधी सेवा प्राधिकरणास भेट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी शाखेच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट दिली. विद्यार्थ्यांनी 'मध्यस्थी" या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील, विद्यापीठाचे विधी विभाग प्रमुख डॉ. विवेक धूपदाळे; बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे उपाध्यक्ष विवेकानंद घाटगे, कौटुंबिक न्यायालयाचे बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.सचिव पाटील यांनी विधी सेवा प्राधिकरण कार्याची सविस्तर माहिती दिली. तसेच न्यायालयीन वाद व तडजोड आपापसात मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असल्याचे सांगितले. डॉ. धूपदाळे यांनी वैकल्पिक वाद निवारण बाबत मार्गदर्शन केले. ॲड. घाडगे यांनी न्यायालयीन प्रकरणांमध्ये मध्यस्थी करताना वकिलांच्या भूमिके विषयी मार्गदर्शन केले. ॲड. पाटील यांनी पथनाट्यामुळे विधी सेवेची माहिती वंचित घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी मदत होत असल्याचे सांगितले.शिवाजी विद्यापीठ विधी शाखा जीएस प्रमोद दाभाडे यांनी प्रास्ताविक केले. प्रियंका गुरव यांनी आभार मानले. यावेळी राजीव माने, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, जयदीप कदम, चंद्रकांत कुरणे, देवदास चौगले, ऋता निंबाळकर, अंजली करपे आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षांचा निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बुधवारी पदवी व पदव्युत्तरच्या २२ अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. या परीक्षेला ५ हजार ६०१ विद्यार्थी बसले होते. या परीक्षेत कोणताही गैरप्रकार परीक्षा प्रमाद समितीसमोर नोंद झालेला नाही. तसेच आतापर्यंत झालेल्या एकूण परीक्षांपैकी ३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यामुळे संबंधीत अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाव्दारे दिली.

तरुण भारत

# सोलापूरच्या सीमा किणीकर यांना यंदाचा कुसुम पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक प्रा. चंद्रकांत शंकर पाटगांवकर यांनी आयुष्यभर समतेचा विचार पोहोचवण्याचे कार्य केले. त्यांच्या मृत्यूपश्चात पाटगावकर कुटुंबियांनी त्यांची शिल्लक रक्कम आंतरभारती शिक्षण मंडळाकडे सोपवली. यातून सामाजिक विविध क्षेत्रात हिरिरीने कार्यरत महिलांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे या हेतूने कुसुम पारितोषिक देण्यात येते. यंदाचा कुसुम पुरस्कार सोलापूर येथील निरामय आरोग्यधामच्या सिमा किणीकर यांना जाहीर झाला आहे. पुरस्कारात ५१ हजार रुपये, शाल, बोधचिन्हाचा समावेश आहे, अशी माहिती आंतरभारती शिक्षण मंडळाच्या पल्लवी कोरगावकर, सुचिता पडळकर, तनुजा शिपूरकर, विनय पाटगावकर यांनी दिली.

पल्लवी कोरगावकर म्हणाल्या, यांच्याकडे पाटगांवकर कुटुंबियांनी दिलेल्या रक्कमेच्या व्याजातून दरवर्षी कुसुम पुरस्कार दिला जातो. यंदाच्या कुसुम पुरस्कारासाठी सीमा किणीकर यांची निवड केली आहे. त्यांनी सोलापुरात निरामय आरोग्यधामच्या माध्यमातून ट्रकचालक, देहविक्रय करणाऱ्या महिला, तृतीयपंथी, एचआयव्ही पॉझिटिव्ह मुले, बिडी कामगार



आदी उच्च जोखीम गटातील लोकांमध्ये ३० वर्षांपासून सक्रियपणे कार्य केले आहेत. सीमा किणीकर, पती डॉ. भालचंद्र किणीकर यांनी ट्रकचालकांचे प्रश्नही हाताळल्याचे सांगितले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शनिवारी, ११ रोजी सायंकाळी ५ वाजता सदर बाजार येथील कोरगावकर हायस्कूल येथे पुरस्कार वितरण होणार आहे. यापुर्वी डॉ. कविता सातव, मुमताज शेख, कांचनताई परुळेकर, मेधा पुरव-सामंत, सुनीती सु. र., डॉ. सुचेता धामणे, डॉ. अपर्णा देशमुख, दिशा पिंकी शेख यांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

तरूण भारत

# पदवी प्रथम वर्षातील स्थगित केलेल्या परीक्षा घ्या

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षांच्या कामकाजावर २ फेब्रुवारीपासून विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे २, ३ व ४ फेब्रुवारी तीन दिवसाच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. विद्यार्थी हित लक्षात घेवून स्थगित केलेल्या बी. ए., बी. एस्सी. प्रथम वर्षातील प्रथम व व्दितीय सेमिस्टरच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर १५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान घेण्याच्या सूचना विद्यापीठ प्रशासनाने



- विद्यापीठ प्रशासनाने परिपत्रकाव्दारे दिल्या महाविद्यालयांना सूचना

परिपत्रकाव्दारे महाविद्यालयांना दिल्या आहेत, तरी याची दखल संबंधीत महाविद्यालयांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत स्थगित केलेल्या बी. ए., बी. कॉम. प्रथम वर्षातील सेमिस्टर एक व सेमिस्टर दोनच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर घ्याव्या. तर बी. कॉम. चे राहिलेले दोन पेपर विद्यापीठ पातळीवर १३ व १४ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणार आहेत.

पुढील सेमिस्टर वेळेत सुरू करण्यासाठी विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे. तसेच २१ फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू होत असली तरी विद्यापीठ परीक्षांचे काम खंडी होवू नये, याची दखल महाविद्यालयांनी घ्यावी. या परीक्षांसंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Times of India

# Cancelled SUK exams rescheduled

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has announced February 13 as the start date of the 274 rescheduled exams that were cancelled last week due to a boycott by Maharashtra State Universities and College Employees Joint Action Committee.

The exams are likely to end by February 24, depending on the course.

Dr Ajitsinh Jadhav, director of the exam and evaluation department, SUK, said, "On Wednesday, exams of a total of 22 courseswere conducted smoothly in colleges and departments by the descriptive (offline) method. A total of 5,601 students appeared for the examinations, and no student was caught misbehaving or copying."

He said, "The examinations are conducted with the cooperation of the non-teaching staffers, as well as the students, who are not involved in the strike. The revised timetable of the cancelled exams has been published on the university website. Students should give the exam as per the schedule."